सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी दिनांक २० फेब्रुवारी, २०२५ पासून दिल्ली व दि. ६ फेब्रुवारी, २०२५ पासून महाराष्ट्र येथे सुरु होणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा (Civil Services) या परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या योजनेबाबत विद्यार्थ्यांकरिता सर्वसाधारण सूचना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३०.१०.२०२३ च्या शासन निर्णयानुसार सन -२०२४-२५ पासून शासनाच्या सर्वकष धोरणांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी मार्फत संघ लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा (Civil Services) स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजना राबविण्यात येत आहे. याअनुषंगाने प्रथम निवड व प्रतीक्षा यादीतील पात्र विद्यार्थ्याचे महाराष्ट्र येथील प्रशिक्षण वर्ग **६ जानेवारी, २०२५** पासून व दिल्ली येथील प्रशिक्षण वर्ग **२० जानेवारी, २०२५** सुरु करण्यात आले आहेत.

तथापि संघ लोकसेवा आयोग (UPSC) - नागरी सेवा (Civil Services) रिक्त जागांवर बार्टी, पुणे मार्फत दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी प्रसिद्ध घोषणापत्रकानुसार दुसरी निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना विकल्प पोर्टलद्वारे पसंतीची प्रशिक्षण संस्था निवड करणेबाबत निर्देश दिलेले होते.त्यानुसार ऑनलाईन पोर्टल मार्फत पसंतीक्रम दिलेल्या विद्यार्थ्यांना रिक्त जागांच्या अनुषंगाने Confirmation Slip ईमेल द्वारे पाठविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार Confirmation Slip प्राप्त व कागदपत्रे तपासणी झालेल्या दुसऱ्या निवड यादी व प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्याचा महाराष्ट्र येथील प्रशिक्षण वर्ग **६ फेब्रुवारी, २०२५** पासून व दिल्ली येथील प्रशिक्षण वर्ग **२० फेब्रुवारी, २०२५** सुरु करण्यात येत आहेत. सदर प्रशिक्षणाच्या अटी व शर्तीचे पालन करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे.

**सदर प्रशिक्षणाबाबत सूचना खालीलप्रमाणे**

१. उमेदवारांना उपरोक्त नमूद परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेसाठी विकल्प पोर्टलच्या माध्यमातून ज्या प्रशिक्षण संस्थेत प्रवेश मिळाला आहे त्या प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत वेळोवेळी संपर्क साधावा.
२. प्रशिक्षण कार्यक्रम बार्टी, पुणे यांनी दिलेल्या विहीत कालावधीमध्ये राबविणे प्रशिक्षण संस्थाना बंधनकारक आहे.
३. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उमेदवाराने प्रवेश घेतल्यावर संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण कालावधी दरम्यान प्रशिक्षण सोडता येणार नाही.
४. बार्टी, पुणे मार्फत पात्र उमेदवारांची कागदपत्रे तपासणी केलेली आहे तथापि उमेदवारांनी पसंती दिलेल्या प्रशिक्षण संस्थेकडे जाऊन सर्व कागदपत्रे तपासणी करून कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा एक संच संबधीत प्रशिक्षण संस्थेकडे सादर करावा.
५. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान कुठेही शासकीय/ निमशासकीय/खाजगी नोकरी करता येणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत या कार्यालयास काही तक्रार प्राप्त झाल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

६. उमेदवाराने कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर केलेले अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र, इतर सर्व आवश्यक कागदपत्रे व सादर केलेली माहिती यामध्ये काही खोटे/तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल, तसेच दरम्यानच्या काळात घेललेले सर्व लाभ परत करावे लागतील.

७. प्रशिक्षण योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रशिक्षण सोडायचे असल्यास घेतलले सर्व लाभ, दरम्यानच्या काळात प्रशिक्षण योजनेकरीता झालेला सर्व खर्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) संस्थेला परत करावा लागेल. तसे न केल्यास कायदेशीर आणि दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

८. उमेदवाराने यापुर्वी बार्टी मार्फत राबविलेल्या UPSC परीक्षा पुर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतला असल्यास सदरच्या उमेदवाराला पुन्हा लाभ घेता येणार नाही. यापूर्वी लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द होईल. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ परत करावे लागतील.

९. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान उमेदवारांकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही. प्रशिक्षण संस्थेतील सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करावे लागेल. तसेच प्रशिक्षण कालावधीमध्ये धुम्रपान/अंमली पदार्थांचे सेवन, मद्यपान, उद्धट वर्तन असे कोणतेही गैर प्रकार केल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल व कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१०. सदर प्रशिक्षण योजने अंतर्गत पात्र उमेदवारांना विद्यावेतन लाभ मिळण्यासाठी किमान उपस्थिती ७५% असणे बंधनकारक राहील. प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण काळात दर महिन्याचे बायोमेट्रिक उपस्थिती पत्रक डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेस प्राप्त झाल्यावर त्याची पडताळणी करून थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे उमेदवारांनी दिलेल्या बँक खात्यावर विद्यावेतनाची रक्कम जमा केली जाईल. प्रत्येक महिन्याची बायोमेट्रिक उपस्थिती किमान ७५% न भरल्यास त्या महिन्याच्या विद्यावेतनास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

११. शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या आरक्षणानुसार लाभार्थी संख्येच्या प्रमाणात महिला, दिव्यांग, अनाथ व वंचित घटक उमेदवारांकरीता जागा आरक्षित ठेवल्या आहेत.

१२. प्रशिक्षण योजनेकरीता निवड झाल्यानंतर उमेदवारांनी प्रशिक्षणासाठी तात्काळ रुजू होणे आवश्यक आहे. जर दिलेल्या तारखेपासून ०७ दिवसाच्या आत उमेदवार रुजू झाले नाही अथवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेशी किंवा निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेशी रूजू होण्याबाबत संपर्क केला नाही तर त्या जागी निवड यादीतील किंवा प्रतीक्षा यादीतील उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१३. सदर स्पर्धा प्रशिक्षण कार्यक्रम ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत असुन उमेदवारांनी त्याचा लाभ घेणे बंधनकारक आहे. ऑनलाईन स्वरुपात प्रशिक्षण राबविण्यात येत नाहीत.

१४. योजनेबाबत सर्व अटी व शर्ती बाबत स्टॅम्प पेपर वर विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य/बंधनकारक आहे.

१५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती http://barti.maharashtra.gov.in संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच योजना बद्दल नवीन माहिती जाणून घेण्यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी उपरोक्त नमूद संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी.

स्वाक्षरी.
(सुनिल वारे)
**महासंचालक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था, बार्टी,पुणे**